माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ४६/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री.मुबशशिर अहेमद खान मकसुदर अहेमद खान,**
**रा.१६०० प्लॉट, फेमस बेकरीच्या मागे, अलीम पिटगिरीणी समोर, अकोट फैल, ता.जि.अकोला.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,**
**सर्वशिक्षा अभियान कार्यालय खामगांव, जि.बुलडाणा.**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)**
**जिल्हा परिषद, बुलडाणा, ता.जि.बुलडाणा.**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २७.०३.२०२६**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| **द्वितीय अपील आदेशाचा दिनांक** | **आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक** | **मूळ तक्रार अर्जाचा दिनांक** |
|---|---|---|
| ०४.०९.२०१८ | -- | २३.०५.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.४०५१/२०१५ दि.०४.०९.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २७.०३.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती निर्मला जाधव व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री. अनिल कंकाळ उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. नंदकिशोर ज्ञानदेव खरात यांचे तर्फे ॲड.राजेंद्र पांडे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. ४०५१/२०१५) मध्ये दिनांक ०४.०९.२०१८ रोजी सुनावणी घेवून *"अपिलार्थीस माहिती पुरविण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांची राहील. त्यांनी ज्युनिअर कॉलेजकडुन माहिती घेवून अपिलार्थीस पुरवावी व तसा अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत ओयागास सादर करावा. २. अपिलार्थीस अद्याप माहितीचे प्रदान झाले नाही. व त्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी जबाबदार आहेत. म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी श्री.एस.के.खरात, श्री.चौधरी, व*



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ

*श्री.जी.डी.गायकवाड (तत्कालीन व विद्यमान) यांना कलम २० (१) नूसार प्रत्येकी रु. २५,०००/- (रुपये पंचविस हजार फक्त) एवढी शास्ती करण्यात येते. ३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णयाची प्रत नोंदणीकृत डाकेने संबंधित जन माहिती अधिकारी यांना पाठवावी. तसेच त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे मासीक वेतनातून उपरोक्त शास्तीची रक्कम एकमुस्तपणे विहीत पध्दतीने वसुल करुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या संबंधित लेखाशिर्षामध्ये चालानद्वारे जमा करावी व चालानच्या प्रतीसह अनुपालन अहवाल, हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा.*" असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र. ४०५१/२०१५ या प्रकरणी दि. १४.०३.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित कलम १८ (१) अन्वये तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे. यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, खामगांव यांचेवतीने लेखी युक्तीवाद सादर करण्यात आलेला आहे. उपरोक्त युक्तीवादाचे अवलोकन केले असता तसेच ॲड. राजेंद्र पांडे यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे वतीने मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे **विश्वास एज्युकेशन सोसायटी विरुध्द राज्य माहिती आयोग, नागपूर, सेट केसरीमल पोरवाल कॉलेज विरुध्द राज्य माहिती आयोग, नागपूर** या प्रकरणात पारित केलेल्या आदेशाकडे लक्ष वेधले असून मा. सर्वोच्च न्यायालय यांचे त्यांनी पारित केलेला **जस्टीस के.एस. पुट्टास्वामी विरुध्द युनियन ऑफ इंडिया** या प्रकरणात खाजगी पणाच्या मुद्यावर (Right to Privacy) पारित केलेल्या आदेशावर लक्ष वेधले असून, मा. उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय यांचे वरील निर्णयाचे अवलोकन केले असता, तसेच जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या लेखी खुलाश्याचे अवलोकन केले असता, प्रस्तुत तक्रार अर्ज कोणत्याही आदेशाशिवाय निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहूल भा. पांडे)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य**

**ठिकाण : अमरावती.**
**दिनांक : २७.०३.२०२६**

जावक क्रमांक 3239 दिनांक 30 APR 2026